# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : सोमवार 19 ऑक्टोबर 1998
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 7. श्री श्रीधर आत्माराम राणे |
| 2. श्री साबाजी त्रिंबक राणे | 8. श्री धोंडू रघुनाथराव राणे |
| 3. श्री मधुकर संभाजी राणे | 9. श्री प्रविण मधुकर राणे |
| 4. श्री मनोहर भिकाजी राणे | 10. श्री दिलिप मधुकर राणे |
| 5. श्री सत्यविजय शिवराम राणे | 11. श्री संतोष श्रीधर राणे |
| 6. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 12. श्री हेमंतकुमार रमेश राणे |

उपरोक्त संस्थेची 'लक्ष्मीपूजनाची सभा' सोमवार दिनांक 19 ऑक्टोबर 1998 रोजी सायंकाळी 4:30 वाजता श्री मधुकर संभाजी राणे यांचे निवास स्थानी संपन्न झाली. सभेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे हे काही अडचणींमुळे अनुपस्थित असल्यामुळे संस्थेचे वयोवृध्द आजीव सभासद श्री धोंडी रघुनाथराव राणे यांची अध्यक्षस्थानी निवड करण्यात आली. या सभेस 12 सभासद उपस्थित होते.

सालाबादप्रमाणे लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम संस्थेचे सभासद श्री मधुकर संभाजी राणे यांचे हस्ते पार पडला. देवाला नैवेद्य दाखवून प्रार्थना करण्यात आली.

अध्यक्षांच्या परवानगीने चिटणीसांनी सभा चालविली व खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

प्रथम दिवंगत व्यक्तीना श्रध्दांजली वाहण्यात आली (1) कै अहिल्याबाई रघुनाथ राणे (2) कै राधाबाई बाळकृष्ण रावराणे (3) कै प्रमोद वासुदेव राणे

तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांना 'रोहिदास समाज उत्कर्ष मंडळ व पूणे सांस्कृतिक मंडळ' यांचे मार्फत दोन पुरस्कार मिळाले त्याबद्दल त्यांचे संस्थेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

तसेच वाडीतील खालील समस्यांवर चर्चा करण्यात आली.

1. वाडीतील नळ पाणी योजना – याबाबतीत चिटणीसांनी खुलाशेवार माहिती दिली. पैसे मंजूर होऊन देखील काम पूर्ण झालेले नाही अशी खंत व्यक्त केली. सर्व सभासदांनी चिटणीसांना अशी विनंती केली की आपण स्वत: माननीय पालक मंत्री श्री नारायणराव राणे यांना लेखी निवेदन देऊन हा प्रश्न मार्गी लावावा.
2. फळसेवाडी ते पिसेकामते जोडणारा रस्ता यावर देखील चर्चा झाली. फळसेवाडी शाळा क्रमांक 2 चे जिल्हा परिषदेस हस्तांतर करणे.
3. माडाचे पाणी येथील बंधारा व इतर सर्व समस्या यांच्यावर खुलाशेवार चर्चा झाली.

शेवटी अध्यक्षांनी सर्व चर्चा ऐकून चर्चेमध्ये ज्या सभासदांनी विशेष भाग घेतला ते श्री सत्यविजय शिवराम राणे, श्री साबाजी त्रिंबक राणे, श्री अविनाश कृष्णाजी राणे यांचे व उपस्थितांचे आभार मानले. तसेच निवास स्थान मालक श्री मधुकर संभाजी राणे यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी चहापाण्याची व्यवस्था केली त्याबद्दल त्यांचेही आभार मानले. तसेच वाडीतील कामे पूर्ण होण्यासाठी गाव पातळीवर ज्यांचे विषेश सहकार्य लाभले ते म्हणजे माननीय मंत्री नारायणराव राणे, तसेच उपसरपंच श्री अंकुश मारुती राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे, श्री तुकाराम विनायक राणे यांचेही आभार मानले.

संस्थेच्या सभेस दिवसें-दिवस अनुपस्थिती वाढते आहे. एकमेकांबद्दल प्रेमभावना व एकी कमी होत चालली आहे याबद्दल खंत व्यक्त केली. यापुढे आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी एवढी इच्छा प्रकट करून ही सभा सायंकाळी 7:30 वाजता संपली असे जाहीर केले.

---